# श्रीपाद सेवा मंडळ : केंद्र वृत्तांत

श्री.धनंजय चितळे

---

## (१) प.पू.सद्‌गुरु श्री.मामांचा अष्टदश पुण्यतिथी महोत्सव; पुणे केंद्र वृत्तांत :

दरवर्षीप्रमाणेच, फाल्गुन कृ.९ व १०; शनिवार दिनांक २९ मार्च व रविवार दिनांक ३० मार्च २००८; असे दोन दिवस, प.पू.सद्‌गुरु श्री.मामांचा पुण्यतिथी महोत्सव अत्यंत प्रसन्न व मंगलमय वातावरणात सुसंपन्न झाला. उत्सवासाठी येणाऱ्या साधक-सद्‌भक्तांची वाढती गर्दी लक्षात घेऊन, यावर्षी सिंहगड रस्ता, पुणे येथील 'पुष्पक मंगल कार्यालया'त महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.

महोत्सवाची सुरुवात, शनिवार दिनांक २९ मार्च २००८ रोजी सायंकाळी ४.०० वाजता झाली. कार्यक्रमस्थळी प.पू.श्री.दादांचे आगमन झाल्यानंतर, सौ.प्रेरणाताई कुलकर्णी यांनी लिहिलेल्या काही पदांचे व प.पू.श्री.दादांच्या काही अभंगांचे गायन झाले. कार्यक्रमाचे निवेदन सौ.प्रेरणाताई कुलकर्णी यांनी केले; तर श्री.जीवन धर्माधिकारी, श्री.राजेंद्र गलगले, सौ.माधवी तळणीकर यांनी त्या पदांना सुरेल स्वरसाज चढविला. त्यांना श्री.योगेश आवळसकर यांनी तबल्यावर, श्री.शैलेश सहस्रबुद्धे यांनी पखवाजावर आणि श्री.कुंभार यांनी तालवाद्यावर साथ केली. उत्तम पदरचना, उत्कट प्रेमाने ओथंबलेल्या चाली आणि भावपूर्ण गायन यांनी हा कार्यक्रम रंगला.

या कार्यक्रमानंतर चहापान झाले व सायंकाळी ५.३० ते ६.३० या वेळात सामुदायिक साधना झाली. त्यानंतर आरती व करुणात्रिपदी झाल्यावर, सायंकाळी ७.३० ते ८.०० या वेळात उपस्थित सर्व साधक-सद्‌भक्तांनी अल्पोपाहार घेतला.

रात्री ८.१५ ते ९.१५ या वेळात, सुप्रसिद्ध गायिका सौ.सावनी शेंडे-साठ्ये यांचे अतिशय श्रवणमधुर असे गायन झाले. 'हंसध्वनी' रागामधील गणेशस्तुतीने आपल्या गायनाची सुरुवात करून, त्यांनी वातावरण भारून टाकले. त्यापाठोपाठ **'बोलावा विठ्ठल पाहावा विठ्ठल ।'**, **'आषाढी कार्तिकी विसरू नका मज ।'**, **'नाम घेता मन निवे ।'**, **'अवघा रंग एक झाला ।'** असे श्रीसंत नामदेव महाराज, श्रीसंत तुकाराम महाराज, श्रीसंत चोखामेळा यांच्या पत्नी श्रीसंत सोयराबाई महाराज यांच्या अभंगरचनांबरोबरच, श्रीसंत मीराबाईंचेही एक पद त्यांनी सादर केले. एक उत्कृष्ट जमलेली मैफल ऐकल्याचे समाधान सर्व श्रोत्यांच्या चेहेऱ्यांवर दिसत होते.

अशा उत्तम रंगलेल्या कार्यक्रमानंतरचा कार्यक्रम रंगवणे, हे कलावंतांच्या दृष्टीने अवघडच असते. पण 'वेद वासुदेव प्रतिष्ठान'ने सादर केलेल्या **'वासुदेव श्वसितम्'** या कार्यक्रमात, पू.श्री.अजितदादा तुकदेव, कु.कल्याणी आमलेकर, कु.रसिका आमलेकर यांनी श्री.केदार तळणीकर (तबला), सौ.माधवी आमलेकर (संवादिनी) यांच्या साथीने हे आव्हान लीलया पेलले. **'कृष्णातीरीच्या वसणाऱ्या । ये औदुंबरी बसणाऱ्या ॥'** या प.प.श्री.वासुदेवानंद सरस्वती स्वामी महाराजांच्या अभंगाचे आर्जवी स्वर, क्षणार्धात सर्वांची मने श्रीक्षेत्र नृसिंहवाडीला घेऊन गेले. या कार्यक्रमाच्या शेवटी सादर केलेल्या, **'श्रीपाद श्रीवल्लभ नरहरी दत्तात्रेया दिगंबरा । वासुदेवानंद सरस्वती सद्‌गुरुराया कृपा करा ॥'** या गजराने तर संपूर्ण सभागृह श्रीदत्तप्रभूंच्या प्रेमाने, प.प.श्री.टेंब्ये स्वामी महाराजांच्या स्मरणाने अक्षरशः गहिवरले. 'या कार्यक्रमाला आणखी वेळ द्यायला हवा होता,' ही सर्व श्रोत्यांची प्रतिक्रियाच कार्यक्रमाचे यश सांगणारी होती. या कार्यक्रमाने महोत्सवाच्या पहिल्या दिवशीच्या कार्यक्रमांची सांगता झाली.

रविवार दिनांक ३० मार्च २००८ रोजी, सकाळी ७.०० वाजता सामुदायिक साधनेने दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. अल्पोपाहारानंतर, ह.भ.प.श्री.वासुदेवबुवा बुरसे यांचे, **'सद्‌गुरुसारिखा सोयरा सज्जन ।'** या अभंगावर बहारदार असे कीर्तन झाले. सद्‌गुरु

श्रीज्ञानेश्वर माउलींच्या अभंगरचनांची, ‘श्रीज्ञानेश्वरी’ची अनेक वैशिष्ट्ये त्यांनी पूर्वरंगात मांडली; तर उत्तररंगात ‘श्रीगुरुचरित्रा’तील भगवान श्रीमन्नृसिंह सरस्वती स्वामी महाराजांच्या आज्ञेने सारे शेत कापून टाकणाऱ्या शेतकरी भक्ताची कथा सांगून, सद्‌गुरुकृपा कशी असते ? याचे अत्यंत मार्मिक असे विवरण त्यांनी केले. त्यांना श्री.शिरीष जोशी यांनी तबल्यावर व सौ.अनुराधा बुरसे यांनी संवादिनीवर अतिशय उत्तम साथ केली.

त्यानंतर सर्व साधक ज्या कार्यक्रमाची अत्यंत आतुरतेने वाट पाहत होते, त्या प.पू.सद्‌गुरु श्री.दादांच्या प्रवचनसेवेला सुरुवात झाली. भगवान सद्‌गुरु श्रीज्ञानेश्वर माउलींची, श्रीज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाच्या मंगलाचरणातील,

**म्हणोनि साधकां तूं माउली । पिके सारस्वत तुझिया पाउलीं ।**
**याकारणें मी साउली । न संडीं तुझी ।। ज्ञाने.१२.०.८।।**

ही अत्यंत आशयघन अशी गोड ओवी त्यांनी सेवेसाठी घेतली होती. ही प्रवचनसेवा ऐकणे म्हणजे ‘**बहुतां सुकृतांची जोडी ।**’ असाच योग होता. (ही प्रवचनसेवा, अनेक साधकांच्या प्रेमळ आग्रहानुसार, याच अंकात प्रसिद्ध केलेली आहे. - कार्यकारी संपादक.) प्रवचनानंतर पुण्यकालाचे भजन व आरती संपन्न झाली.

दुपारी १२.३० ते ३.०० या वेळात, उपस्थित सर्व साधक-सद्‌भक्तांनी अवीट गोडीच्या महाप्रसादाचा लाभ घेतला व त्यानंतर सर्व साधकांनी प.पू.सद्‌गुरु श्री.दादांचे दर्शन घेतले.

सायंकाळी ४.३० वाजता, ख्यातनाम गायिका सौ.मंजिरीताई आलेगांवकर यांनी, आपल्या सुमधुर गायनाने सद्‌गुरुचरणी सेवा रुजू केली. ‘भवसागरातून पार करा !’ अशी सद्‌गुरूंना विनवणी करणारी चीज, त्यांनी राग ‘पुरिया धनश्री’मध्ये गायिली. त्यानंतर श्रीसंत कबीर महाराजांच्या निर्गुणी भजनांचा आनंद त्यांनी श्रोत्यांना दिला.

दोन्ही दिवशी झालेल्या कार्यक्रमांतील सर्व कलावंतांचा प.पू.सद्‌गुरु श्री.दादांच्या हस्ते शाल, श्रीफळ व प्रसाद देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

त्याच रात्री ८.०० ते १२.०० या काळात, प.पू.सद्‌गुरु श्री.मामांची अनुपम सुंदर अशी राजोपचार महापूजा, प्रतिवर्षीप्रमाणेच ‘श्रीपाद निवास’ येथे थाटामाटात संपन्न झाली.

दोन्ही दिवस कार्यक्रमांना साधक-बंधुभगिनींची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती. याच वेळी ‘**श्रीवामनराज प्रकाशना**’च्या ग्रंथविक्रीव्यवस्थेचाही लाभ उपस्थितांनी घेतला. श्रीसद्‌गुरुकृपेची अखंड प्रचिती देणारा, सुयोग्य नियोजन आणि शिस्तबद्धरितीने पार पडलेला, हा देखणा महोत्सव-सोहळा मनाच्या कुपीत साठवून, सर्व साधक आपापल्या स्थानी रवाना झाले.

□□

# ‘ज्ञानदेव वाङ्मय अभ्यास-चर्चासत्रा’चा वृत्तांत

सौ.ज्योत्स्ना घाटपांडे

पुणे विद्यापीठाचे **‘संत ज्ञानदेव अध्यासन’** आणि **‘श्रीपाद सेवा मंडळ’** पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने, दिनांक २८, २९ व ३० मे २००८ असे तीन दिवस आयोजित केलेले, सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वाङ्मयाच्या अभ्यासाविषयीचे चर्चासत्र, नुकतेच ‘श्रीपाद निवास’ येथे अतिशय यशस्वीपणे संपन्न झाले.

या चर्चासत्राच्या आयोजनात ‘श्रीपाद सेवा मंडळा’चा फार मोलाचा वाटा होता. तीनही दिवस सकाळी ९ ते १२ व सायंकाळी ४ ते ७ या वेळात व्याख्यानसत्रे झाली. काही सत्रांमध्ये प्रश्नोत्तरांचा, शंकासमाधानाचा कार्यक्रमही झाला.

दिनांक २८ मे २००८ रोजी सकाळी, ‘श्रीपाद सेवा मंडळा’चे अध्यक्ष प.पू.श्री.शिरीषदादा कवडे, ‘संत ज्ञानदेव अध्यासना’चे अध्यक्ष डॉ.यशवंत पाठक आणि पहिल्या सत्रातील प्रमुख वक्ते ह.भ.प.श्री.मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराज या सन्माननीय त्रयीच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन, चर्चासत्राचे औचित्यपूर्ण उद्घाटन झाले.

**‘श्रीमाउलींच्या अभंगगाथ्याचे स्वरूप’** या नियोजित विषयासंदर्भात बोलताना, आदरणीय ह.भ.प.श्री.मुकुंदकाका म्हणाले की; ‘‘माउलींची अभंगवाणी ही स्वयंसिद्ध, स्वयंस्फूर्त आहे. श्रीमाउलींनी जनमानसासाठी आध्यात्मिक विचार या अभंगवाणीतून प्रकट केला. अभंग हे व्याकरणदृष्ट्या वृत्त आहे; पण उपमा, उत्प्रेक्षा इत्यादी अलंकार, साहित्यविचार, तत्त्वज्ञान, स्वर, ताल, लय अशा अनेक अंगांनी माउलींच्या अभंगांचे चिंतन करता येणे शक्य आहे. माउलींच्या अभंगगाथ्याचे एकूण अठ्ठावीस प्रकार आहेत. या नऊशे शहाण्णव अभंगांमध्ये स्वरूपवर्णन, हरिपाठ, बालक्रीडा, योग, अद्वैत-अनुभूती, नाममाहात्म्य, गुरु-शिष्य संवाद, कूट अभंग, विराणी, विरहिणी असे विविध प्रकार आहेत. या अभंगांना भगवान श्रीपांडुरंगांचे आशीर्वाद आहेत.’’

‘विराणी’ व ‘विरहिणी’ यांतील फरकही त्यांनी अतिशय सुंदर रीतीने समजावून सांगितला; ‘‘परमार्थ करताना, संसारी जीवांचा होणारा विरोध न जुमानता साधनामार्गावरून मार्गक्रमण करण्याची वृत्ती ही ‘वीरवृत्ती’; त्या वृत्तीतून निर्मिली गेलेली रचना ही ‘विराणी’. ज्ञानोत्तर भगवत्प्रेमभक्ती प्राप्त झाल्यावर, भगवंतांच्या विरहाच्या भावनेतून उमटलेली ती ‘विरहिणी’ होय.’’ (ह.भ.प.श्री.मुकुंदकाकांच्या या विधानाची यथार्थता अभ्यासकांनी तपासून घेणे गरजेचे आहे. - संपादक.)

हे सर्व विवेचन करीत असताना, ‘‘मराठी संतांच्या अभंगांचे जनकत्व माउलींच्या अभंगवाणीत आहे,’’ असे त्यांनी आवर्जून नमूद केले. तसेच, **‘स्वरूपं सुंदरं यस्य, परिणामः शिवप्रदः । आशयः सत्यरूपश्च तत् साहित्यं विदुर्बुधाः ॥’** ही ‘साहित्य’ या शब्दाची यथार्थ व्याख्या देखील माउलींच्या साहित्याला तंतोतंत लागू पडते; असेही त्यांनी सांगितले.

याच दिवशी सायंकाळच्या सत्रात, संतसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक आणि ‘बापरखुमादेविवरु’ परिवाराचे लेखक-सदस्य डॉ.यशवंत साधु यांनी, **‘अमृतानुभवातील आत्मानुभूतीचे सौंदर्य’** या विषयावर आपले विचार प्रकट केले.

‘‘संपूर्ण जग हे शिव-शक्तीचा विलासच आहे; या निखळ अनुभवाची मांडणी म्हणजे ‘अमृतानुभव’ ! हा सिद्धानुवाद आहे. म्हणजे सिद्धपुरुषाच्या अनुभूतीचे प्रकटीकरण आहे. हे नितांतसुंदर असे जणू गीतच आहे. सद्गुरुकृपेने लाभलेल्या अमृताच्या, परब्रह्माच्या अक्षय-अनुभवाचा रसोल्लास असाच हा ग्रंथ आहे. देशकाल-अवकाशाच्या सीमा भेदून त्यापलीकडे जाणारी, वैश्विक अशा परावाणीतून उद्भूत झालेली, सद्गुरूंनी केलेल्या बोधाची ही अनुभूती ‘अमृतानुभवा’त प्रकट झालेली आहे.’’

''माउलींसारख्या सर्वश्रेष्ठ सौंदर्योपासक संतकवीची अनुभूती, आपल्यासारख्या सामान्य माणसाकडून यथार्थपणे चर्चिली जाणे हे कदापि शक्य नाही !'' असेही त्यांनी यावेळी नम्रपणे स्पष्ट केले. साहित्यसौंदर्याच्या अंगाने त्यांनी केलेला या ग्रंथाचा प्रगल्भ विचार, श्रोत्यांना मूळ ग्रंथाच्या प्रत्यक्ष भेटीची आस मात्र निश्चितच लावून गेला. हे त्यांच्या व्याख्यानाचे यशच म्हटले पाहिजे.

डॉ.यशवंत साधु यांच्या व्याख्यानानंतर, समारोप करताना प.पू.श्री.दादा म्हणाले की; ''परब्रह्म हे सत्‌चित्‌आनंदस्वरूप आहे असे म्हटले जाते. या तीन पदांपैकी जर केवळ एकाच पदाने परमात्म्याचा निर्देश करायचा झाला, तर तो 'आनंद' या पदानेच करावा लागेल. 'अमृतानुभव' ही परमात्मस्वरूपाने घेतलेली स्वतःच्या सौंदर्याची आनंदानुभूती आहे !''

त्यानंतर, यासंदर्भात अतिशय मार्मिक अशी एक झेन कथा सांगून, त्या प्रसंगाकडे पाहण्याची श्रीमाउलींची दृष्टी कशी असेल ? हेही त्यांनी अतिशय गोड शब्दांत सांगितले.

याच दिवशी रात्री ९.०० वाजता, अनेक साधक-बंधुभगिनींनी 'हरिपाठ-गायनसेवा' सद्‌गुरु श्रीज्ञानेश्वर माउलींच्या चरणी रुजू केली.

गुरुवार दिनांक २९ मे २००८ रोजी सकाळच्या सत्रात, श्रीमाउलींच्या वाङ्मयाचे जाणकार अभ्यासक, पुणे विद्यापीठाचे तत्त्वज्ञान विषयाचे निवृत्त विभागप्रमुख डॉ.शं.रा.तळघट्टी यांनी, **'चांगदेव पासष्टीतील तत्त्वज्ञान'** या विषयावर अतिशय अभ्यासपूर्ण असे विवेचन केले.

''माउलींच्या संपूर्ण वाङ्मयात अद्वैत-तत्त्वज्ञानाचेच दर्शन आहे. माझा विचार येथे केवळ 'पासष्टी'पुरता मर्यादित आहे;'' हे प्रारंभीच स्पष्ट करून, डॉ.शं.रा.तळघट्टी म्हणाले की, '''चांगदेव पासष्टी' हा ज्ञानदेव-दर्शनाचा सूत्रग्रंथ आहे. तो समजावून सांगण्यासाठी विशेष स्पष्टीकरणाची आवश्यकता भासते. चांगदेव हे महायोगी, महाज्ञानी असल्यामुळेच, केवळ 'पासष्ट ओव्यांच्या पत्रा'द्वारे माउलींनी त्यांना 'तू शाश्वत अशा आत्मानंदाचा धनी हो !' असा अमृतोपम उपदेश या ग्रंथातून केला आहे. 'चांगदेव पासष्टी' ही एक सिद्धभेट असून, 'आत्मदर्शनातील आडळ' म्हणजे 'अविद्येचा मल' दूर करण्याचा उपदेश हे या ग्रंथाचे सार आहे.'' असे अतिशय मुद्देसूद व नेटके विवेचन डॉ.तळघट्टी यांनी केले.

डॉ.शं.रा.तळघट्टी यांच्या व्याख्यानानंतर समारोप करताना, 'चांगदेव पासष्टी'च्या संदर्भात प.पू.श्री.दादा म्हणाले की; ''चांगदेव हे महायोगी, महाज्ञानी होते. ते निर्विकल्प अवस्थेत स्थित असत. श्री.वटेश्वर हे त्यांचे सद्‌गुरु. चित्त पूर्ण शुद्ध, निर्वासन झाल्याशिवाय निर्विकल्पसमाधीची स्थिती प्राप्त होत नसते. त्यामुळे चांगदेवांचा प्रश्न हा वासना वा अहंकार एवढ्यापुरताच मर्यादित असा साधा प्रश्न नव्हता. त्यांचा खरा प्रश्न वेगळाच होता.

त्यांनी श्रीमाउलींकडे कोरा कागद पाठविला. तो कोरा कागद किंवा कोरे पत्र हे त्यांच्या शुद्ध, कोऱ्या चित्ताचेच द्योतक होते. ते व्याघ्रारूढ होऊन, सर्पाचा चाबूक घेऊन माउलींच्या भेटीला आले; तेही त्याच चित्तस्थितीचा निर्देश करण्याकरिता. त्यासाठीच्या संदर्भाचा पुरावा आपल्याला पुढे श्रीसंत तुकाराम महाराजांच्या अभंगात सापडतो. **'चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही न खाती सर्प तया ।। तु.गा.६१६.१ ।।'**

त्यांना त्यांच्याच पद्धतीने खूण देण्याकरिता म्हणून, श्रीमाउलींनी भिंत चालविली. परब्रह्माच्या आनंदमयतेची, अमृतस्वरूपाची सर्वत्र अनुभूती घेणाऱ्या श्रीमाउलींच्या हृदयात आनंदकल्लोळ उचंबळल्याने, ते ज्या भिंतीवर बसले होते ती भिंत देखील त्या आनंदानुभूतीने उचंबळून उचलली गेली. ते पाहूनच चांगदेव श्रीमाउलींना संपूर्ण शरण आले !'' अशाच स्वरूपाची आनंदानुभूती घेणारे महात्मा प.पू.सद्‌गुरु श्री.मामा, यांच्या चरित्रातील स्वतः अनुभवलेले दोन अतिशय महत्त्वाचे प्रसंगही त्यांनी यासंदर्भात सांगितले.

त्यानंतर, प.पू.श्री.दादा पुढे म्हणाले की; ''श्रीचांगदेवांच्या संदर्भात पाहायचे झाले तर, त्यांनी परब्रह्माच्या सत-चित्-आनंदस्वरूपांपैकी 'सत्'स्वरूपाची अनुभूती घेतली होती. ते महान योगी, महाज्ञानी जरी होते,

तरी ती ज्ञानजाणीवही उरू नये याकरिता, ती कोठे विसर्जित करावी ? हे त्यांना ज्ञात नव्हते. परमात्म्याच्या चिदानंदस्वरूपात ती जाणीव, तो ज्ञानाहंतेचा लेश विसर्जित करायचा असतो, हाच बोध या पासष्ट ओव्यांतून श्रीमाउलींनी चांगदेवांना केलेला आहे. तो बोध समजण्यासाठी, आधी 'श्रीज्ञानेश्वरी'प्रमाणे आचरण घडावे लागते, 'अमृतानुभव' पचवावा लागतो; मग 'पासष्टी' प्रकट होते. चौसष्ट कलांनंतर मग कोठे ती पासष्टावी कला प्रकट होते.

'उत्तर पंचविशी' हे 'चांगदेव पासष्टी'ला पंचवीस ओव्यांचे चांगदेवांचे उत्तरही श्रीमाउलींच्या नावे नंतर कोणीतरी प्रसिद्ध केले आहे. अर्थात् त्याच्या शैलीवरून, धाटणीवरून ते श्रीमाउलींनी लिहिलेले नाही हे स्पष्टच होते. त्यातील तेवीस ओव्या, ज्यांचा अर्थ कोणीही करू शकणार नाही, अशा विचित्र आहेत. पण दोन ओव्या मात्र थेट श्रीमाउलींचीच तत्त्वपरंपरा सांगणाऱ्या आहेत. ही 'उत्तर पंचविशी' देखील 'श्रीवामनराज प्रकाशना'ने प्रकाशित केलेली आहे.''

याच दिवशी संध्याकाळच्या सत्रात, सोलापूरचे व्यासंगी अभ्यासक आणि 'बापरखुमादेविवरु' परिवारातील ज्येष्ठ लेखक, डॉ.नरेंद्र कुंटे यांनी **'हरिपाठातील नामशास्त्र'** या सर्वांच्या अतिशय जिव्हाळ्याच्या विषयावर आपले विचार प्रकट केले. ते म्हणाले की; ''हरिपाठ हा खरेतर 'नामपाठ'च आहे. यात नामाचे स्वरूप, माहात्म्य, नामसाधना व तिची फलश्रुती सांगितलेली आहे. संसाराचे मिथ्यात्व, भगवत्स्वरूपाचे सगुण-निर्गुण प्रकार, द्वैताद्वैत असे अनेक विषय या ग्रंथात ओघाने येतात. तरीही नवविधा भक्तीतील चौथ्या 'नामस्मरण' भक्तीच्या संदर्भातील विचार प्रामुख्याने या ग्रंथात आढळतो.

हरीचे द्वार - मुख्यद्वार, सद्गुरूंची भेट होऊन त्यांचा कृपाबोध, साधनेचे स्वरूप व ईश्वरदर्शनाची फलश्रुती अशी 'हरिपाठ' या लघुग्रंथाची चतुःसूत्री आहे. आपल्याला तत्त्वज्ञानाकडून भगवद्भक्तीकडे घेऊन जाणारा हा ग्रंथ असून, त्यात अठ्ठावीस अभंग आहेत. (१) नामसाधना कुठे करावी ? (२) नाम कोण देतो ? (३) नामप्राप्तीनंतरही सत्संगाची आवश्यकता काय ? (४) नामसाधना कशी करावी ? (५) नामसाधनेची फलश्रुती काय ? अशा पाच महत्त्वाच्या प्रश्नांचा उलगडा या ग्रंथातून होतो, असे त्यांनी नमूद केले.

**'हरिपाठातील नामशास्त्र'** या विषयावरील डॉ.नरेंद्र कुंटे यांच्या रसाळ व्याख्यानानंतर, प.पू.श्री.दादांनी समारोपादाखल थोडक्यात पण अतिशय विलक्षण असे अभ्यासपूर्ण भाष्य केले. ते म्हणाले; ''हरिपाठातील पहिला अभंग **'देवाचियें द्वारीं, उभा क्षणभरी । (हरि.१.१)'** आहे. यातील प्रथम चरणात आलेल्या **'क्षणभरी'** या शब्दाचा अर्थ 'घड्याळ लावून क्षणभर' असा नव्हे. श्राद्धविधी संपन्न करण्यासाठी आचार्यांना निमंत्रित करणे, याला शास्त्रीय परिभाषेत 'क्षण देणे' असे म्हणतात. हे श्राद्ध कोणाचे ? तर, 'देह-भावने'चे, 'अहं जाणीवे'चे, 'मी-माझे' या जाणीवेचे. असे श्राद्ध सामर्थ्यसंपन्न सद्गुरु आचार्यांकडून संपन्न करून घेऊन, (अशा त्यांना क्षण देऊन) मग जो देवाच्या द्वारी उभा राहील, त्यास चारही मुक्ती प्राप्त होतील !''

याशिवाय प.पू.सद्गुरु श्री.मामांकडील हरिपाठाच्या एका हस्तलिखित प्रतीचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की; **'हरि मुखें म्हणा ।'** असे वैखरीने हरी म्हणता म्हणता, **'हरि मुके म्हणा ।'** (प.पू.सद्गुरु श्री.मामांजवळील प्रतीतील पाठ) सुरुवातीला वैखरीने होणारे नाम, साधना करता करता पुढे सद्गुरुकृपेने आपोआप आतल्या आत अखंड घडू लागते. **'ज्ञानदेवा मौन जपमाळ अंतरी । (हरि.२६.४)'** अशी अवस्था प्राप्त होणे, असे मौनातले नाम होणे महत्त्वाचे आहे; हेही त्यांनी मोठ्या सुंदर आणि गोड शब्दांत उकलून सांगितले.

शुक्रवार दिनांक ३० मे २००८ रोजी सकाळच्या सत्रात, संस्कृत विषयाचे व संतवाङ्मयाचे ज्येष्ठ अभ्यासक, 'बापरखुमादेविवरु' परिवार सदस्य असलेले, उमरगा येथील ह.भ.प.डॉ.श्री.सिद्धेश्वर बलराम महाराज यांनी **'ज्ञानेश्वरीतील गुरुवंदना'** या विषयावर आपले विचार व्यक्त केले.

''सद्गुरु हे व्यक्ती नसून तत्त्व आहे. सद्गुरूच शिष्याला खऱ्या अर्थाने

घडवत असतात, असा दृढ विश्वास भारतीय संस्कृतीत रुजलेला आहे.'' असे सांगून, 'आई' आणि 'माउली' या दोन शब्दांतील फरक सांगताना, ''आई केवळ या जन्मापुरती व लौकिकाचीच काळजी वाहते; पण माउली मात्र इहपर जन्मांतील काळजी सर्वथैव वाहत असल्याने, माउली ही आईपेक्षाही श्रेष्ठ आहे. त्यामुळेच सद्‌गुरूंना 'माउली' म्हटले जाते;'' असे त्यांनी स्पष्ट केले. ''सद्‌गुरु जीवाचा अज्ञानमल दूर करतात. त्याची त्रिविध-तापांतून मुक्तता करतात आणि त्याच्या हृदयी कृपाबोध रुजवून त्याचे जीवत्व फिटवितात; त्याला शिवस्वरूप करून सोडतात.'' असे सांगून, श्रीज्ञानेश्वरीच्या दहाव्या ते अठराव्या अध्यायांच्या प्रारंभी, श्रीमाउलींनी रचलेल्या सद्‌गुरूंच्या स्तुतिपर, वर्णनपर अशा ओव्यांचा सद्‌गुरुमाहात्म्य, उपासना, मानसपूजा यांच्या संदर्भात त्यांनी ऊहापोह केला.

यासंदर्भात समारोपाचे बोलताना प.पू.श्री.दादा म्हणाले की; ''श्रीमाउलींची काव्यकन्या ही त्यांच्यासारखीच समर्थ, ब्रह्मरस-लावण्याने ओथंबलेली आहे. भगवत्प्रेम हे तिचे हृदय आहे. भगवद्‌भक्तीचे विविध प्रकार हे तिचे करचरण आहेत. समता आणि करुणा हे तिचे नेत्र आहेत. शब्दांच्या नाना अर्थांची वस्त्रे, अलंकार ती ल्यालेली आहे. मात्र तिने कंठी धारण केलेला रत्नहार आपल्या पदराआड दडविला आहे. केवळ सद्‌गुरुकृपेनेच त्या रत्नहाराचे दर्शन घडणे शक्य आहे. संप्रदायाच्या, सद्‌गुरूंच्या कृपाप्रसादाशिवाय ते गूढ आकळत नाही. माउलींच्या प्रत्येक ओवीत, गुह्य स्वरूपात एक एक 'शाबर मंत्र' नाथसंप्रदायाच्या संकेतानुसार दडलेला असतो !''

''श्रीज्ञानेश्वरीच्या सुरुवातीच्या नऊ अध्यायांत सद्‌गुरुवंदन वा स्तुती नाही; ती दहा ते अठरा या अध्यायांतच येते; असे का ?'' या डॉ.सिद्धेश्वर बलराम महाराज यांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना प.पू.श्री.दादा म्हणाले की; ''माउलींची सद्‌गुरुवंदना वा सद्‌गुरुस्तुती ही त्या त्या विशिष्ट अध्यायारंभी, ते ते विशिष्ट प्रयोजन सिद्ध व्हावे यासाठी प्रकटलेली असते. म्हणून त्या त्या स्थळी, ठरावीक पद्धतीने ते ते स्तवन आले आहे. सद्‌गुरुस्तवनांमध्येही 'सांजन' (सगुण साकार) व 'निरंजन' (निर्गुण निराकार) स्वरूपांचे स्तवन असे दोन प्रकार असतात. यांपैकी 'सांजन' स्तवनात 'गाणेश', 'सारस्वत' व 'कौल' अशी तीन पद्धतींची स्तवने आढळतात.''

त्यानंतर सद्‌गुरुभक्तीच्या संदर्भात बोलताना प.पू.श्री.दादा म्हणाले; ''शास्त्रांचा असा नियम आहे की, जोवर वासना शिल्लक आहेत, जोवर संपूर्ण चित्तशुद्धी झालेली नाही; तोवर श्रीसद्‌गुरूंची सख्य, माधुर्य आणि त्यांना पुत्र समजून घडणारी वात्सल्यभक्तीही करू नये. कारण तोपर्यंत तो जीव 'खऱ्या अर्थाने' त्यांचे बाळ होऊ शकत नसतो. जीवातील स्त्रीत्वाचा, पुरुषत्वाचा अहंकार फिटल्यानंतरच, तो जीव त्यांचे 'तो बाळ' किंवा 'ती बाळ' असे न राहता, 'ते बाळ' होतो !'' यासाठी त्यांनी श्रीसंत नामदेव महाराजांच्या अभंगांतील उदाहरणे दिली. भगवान श्रीपांडुरंगांच्या मुखी या अभंगांत, **'माझे नामे'**, **'माझे विठे'** (श्रीनामदेव महाराजांचे पुत्र श्रीविठा महाराज) असे उल्लेख येतात; हे त्यांनी त्याद्वारे निदर्शनास आणून दिले. सद्‌गुरूंच्याच कृपेने होणाऱ्या भक्तिसंदर्भात प.पू.श्री.दादांनी केलेले हे विवेचन, सर्वांनाच अतिशय अंतर्मुख करून गेले.

याच दिवशी संध्याकाळच्या सत्रातील, कु.जुई धायगुडे यांच्या सुरेल गायनाने या त्रिदिवसीय अभ्यास-चर्चासत्राची सांगता झाली. गानसरस्वती किशोरी आमोणकर यांनी स्वरबद्ध केलेल्या राग हंसध्वनीमधील 'गणेशस्तवना'ने त्यांनी गायनाला प्रारंभ केला. त्यानंतर **'ज्ञानोबा माउली तुकाराम'** हा गजर, **'ॐ नमोजी आद्या ।'** आदी श्रीज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायातील गणेशस्तवनाच्या ओव्या; **'एक तत्त्व नाम दृढ धरी मना ।'**, **'जाणे अज मी अजर ।'**, **'अवचिता परिमळु ।'**, **'विश्व ब्रह्म भासे ऐक्य येता देही ।'**, **'दीपप्रकाश दीपी सामावला ।'** आणि **'पसायदान'** इत्यादी श्रीमाउलींच्या रचना त्यांनी गायिल्या. त्यांना श्री.राजगोपाल गोसावी यांनी तबल्यावर, श्री.अभिजीत पाटसकर यांनी संवादिनीवर, सौ.वसुधा खोडके यांनी स्वरसाथ आणि कु.तेजस्विनी प्रभुदेसाई यांनी तंबोऱ्यावर व स्वरसाथ आणि श्री.राहूल कुलकर्णी यांनी तालवाद्यावर सुंदर साथ केली.

या सर्वच सत्रांत, प्रमुख आमंत्रितांचा 'श्रीपाद सेवा मंडळा'चे अध्यक्ष

प.पू.श्री.शिरीषदादा व ‘संत ज्ञानदेव अध्यासना’चे अध्यक्ष डॉ.यशवंत पाठक या उभयतांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. त्याचप्रमाणे तीनही दिवस कार्यक्रमांचे अतिशय नेटके सूत्रसंचालन करणारे डॉ.अरुण प्रभुणे यांचा; आणि या ‘संत ज्ञानदेव वाङ्मय-अभ्यास चर्चासत्रा’च्या आयोजनात मोलाचा सहभाग असलेले ‘श्रीपाद सेवा मंडळा’चे पूर्णवेळ कार्यकर्ते श्री.रोहन उपळेकर यांचा अध्यासनाच्या वतीने डॉ.यशवंत पाठक यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन हृद्य सत्कार करण्यात आला.

प्रत्येक सत्रात, व्याख्यानसमाप्तीला डॉ.यशवंत पाठक हे अध्यासनाच्या वतीने काही मार्मिक गोष्टींवर प्रकाश टाकीत. त्यावेळी त्यांनी केलेल्या प्रेमळ आग्रहामुळे, प.पू.श्री.दादांनी वेळोवेळी केलेली अनुभवसमृद्ध व आशयघन भाष्ये ही अत्यंत लक्ष्यवेधी व श्रोत्यांच्या हृदयांचा ठाव घेणारी ठरली.

सद्गुरु श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या समग्र वाङ्मयावर, ‘संत ज्ञानदेव अध्यासन’ व ‘श्रीपाद सेवा मंडळ’ यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच असे तीन दिवसीय अभ्यास-चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. या चर्चासत्राला श्रीमाउलींच्या वाङ्मयाच्या अनेक व्यासंगी व जाणकार अभ्यासकांनी उपस्थित राहून अतिशय उत्तम प्रतिसाद दिला. तीनही दिवस, सकाळ-संध्याकाळ अभ्यासक श्रोत्यांची असणारी भरगच्च उपस्थिती, ही देखील या कार्यक्रमाच्या यशाचे एक द्योतकच म्हटली पाहिजे. भगवान श्रीज्ञानदेव माउलींच्या व प.पू.सद्गुरु श्री.मामांच्या कृपेने, डॉ.यशवंत पाठक आणि प.पू.श्री.दादांच्या कुशल व उत्कृष्ट अशा मार्गदर्शनाने व प्रेरणेने आणि स्वयंसेवकांच्या शिस्तबद्ध आयोजनाने हा त्रिदिवसीय अभ्यास-चर्चासत्राचा उपक्रम अतिशय उत्साहाने, यशस्वीपणे संपन्न झाला.

□□